बीड । शनिवार
२८.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ८८
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# जालना येथील शेतकरी अनुदान घोटाळा प्रकरणात बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके गोत्यात येणार ?

## • अंबड चे तत्कालीन तहसीलदार शेळके यांच्यासह चार तहसीलदारावर कारवाई करण्याचे सरकारकडे प्रस्ताव !

## • फौजदारी गुन्हे दाखल करण्याची शिफारस ; राज्य शासनाकडून कारवाईला वेग !

**बीड । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील अतिवृष्टी व गारपीट मुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान भरपाई म्हणून शासनाकडून अनुदान मंजूर झाले होते. या अनुदान वाटपात प्रचंड भ्रष्टाचार झाल्याची तक्रार शेतकऱ्याकडून करण्यात आली होती. या संपूर्ण अनुदान वाटपाची चौकशी जिल्हाधिकारी यांनी केली. एकाच शेतकऱ्याच्या नावाने दुसऱ्यांदा तर अनेक बोगस शेतकऱ्यांची नावे या अनुदानामध्ये घेण्यात आली होती. या घोटाळ्याची व्याप्ती तब्बल ४२ कोटी रुपयांपर्यंत वाढली हा आकडा वाढण्याची शक्यता आजही आहे. तब्बल ७२ कोटी रुपयांपर्यंत हा आकडा जाण्याची शक्यता आहे. या गंभीर प्रकरणात अनेक कर्मचारी अधिकारी निलंबित झाले आहेत, तर अनेकांची विभागीय चौकशी सुरू आहे यातच पाच तहसीलदार विरोधात जिल्हा अधिकाऱ्यांनी राज्य शासनाकडे फौजदारी गुन्हे दाखल करण्याची शिफारस केली असून येत्या काळात राज्य शासन या तहसीलदारावर काय कारवाई करणार याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. या घोटाळ्यात अंबडचे तत्कालीन तहसीलदार व बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे नाव आल्याने बीडमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

जालना जिल्ह्यातील शेतकरी अनुदान वाटप घोटाळा उघड झाल्यानंतर ८९ कर्मचारी चौकशीत दोषी आढळले आहेत. यात तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायकांचा समावेश असल्याचे उघड झाले होते. मागील आठवड्यात प्रशासनाने १० तलाठ्यांचे निलंबन केले होते. पुन्हा ७ तलाठी, ४ सहायक महसूल कर्मचारी अशा ११ कर्मचाऱ्यांचे निलंबन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे. यामुळे निलंबित झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या २१ झाली आहे. तसेच ३५ तलाठ्यांची विभागीय चौकशी सुरू झालेली आहे. ५ तहसीलदार व ६ नायब तहसीलदारांवर कारवाई करण्याचा अहवाल शासनास सादर करण्यात आला असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. या घोटाळ्यात ज्या पाच तहसीलदारावर ठपका ठेवण्यात आला आहे यामध्ये तत्कालीन अंबडचे तहसीलदार व सध्या बीड तहसीलचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे नाव समोर आले आहे. जालना येथील जिल्हाधिकारी पांचाळ यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

# शिवछत्र परिवार दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करणार: रणवीर पंडित

## भवानी बँक कॉलनी, गेवराई मध्ये सिमेंट रस्ता व नाली बांधकाम उद्घाटन

**गेवराई । प्रतिनिधी**

मागील निवडणुकीत मतदारांनी मोठ्या विश्वासाने विजयसिंह पंडित यांना निवडणूक दिलेले आहे. त्यावेळी शिवछत्र परिवारातील सदस्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यात येईल. असे आश्वासन मा. रणवीर अमरसिंह पंडित यांनी दिले.



ते गेवराई शहरातील महिला म हाविद्यालय च्या पूर्वेस असणाऱ्या भवानी बँक कॉलनी मध्ये २६ लक्ष रुपये किंमतीच्या 'सिमेंट रस्ता व नाली बांधकाम' कामाच्या उद्घाटन समारंभप्रसंगी बोलत होते. शिवछत्र परिवारातील नवीन पीढी चे उच्च शिक्षित असे युवा नेतृत्व आदरणीय रणवीर अमरसिंह पंडित यांच्या हस्ते या कामाचे उद्घाटन ▶▶ उर्वरित पान २ वर

## राज्यातील ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील महायुती सरकारकडून गेल्या काही म हिन्यात आएएस आणि आयपीएस (IPS) अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका लावण्यात आल्याचं पाहायला मिळत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सातत्याने बदल्या होत असून आता तब्बल ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये, पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, धुळे, हिंगोली, जळगाव येथील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यामध्ये, पुण्यातील शस्त्र ▶▶ उर्वरित पान २ वर

# धारूर घाटात खाद्य तेलाचे टँकर पलटी



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर घाट रस्ता वाहतुकीसाठी मोठी आडचण बनला आहे या घाटात अपघाताची मालिका सुरूच आहे दि. २६. जुन गुरूवार रोजी सायंकाळच्या वेळी चार च्या दरम्यान १२ टायरी गोडतेल घेऊन जाणारे टँकर रस्त्याच्या मध्यभागी पलटी झाले. यामुळे घाटात सर्वत्र खाद्य तेल दुर वर वाहत गेले. यामुळे धारूर घाटात तब्बल दोन तास ट्रॉफिक झाली होती. ही ट्राफिक हटवण्यासाठी पोलीसांना मोठ्या प्रमाणात कष्ट घ्यावे लागले. धारूर घाटातील रस्त्याचे काम मंजुर असुन ते लवकरात लवकर मार्गी लावावे अशी मागणी तालुक्यातील नागरिक करत आहेत.

## वंचित बहुजन आघाडीचे जागरण गोंधळ आंदोलन; तहसीलदारांकडून लेखी आश्वासने



**पाटोदा । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने छत्रपती शिवाजी म हाराज चौक येथून जागरण गोंधळ करत पाटोदा तहसील कार्यालयापर्यंत एका मोठ्या प्रमाणावर पायी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले, ज्यात आघाडीच्या कार्यकर्त्यांनी ९ प्रमुख मागण्यांसाठी जागरण गोंधळ आंदोलन केले. जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन शांततेत आणि संयमाने पार पडले.

या आंदोलनामध्ये वंचित बहुजन वर्गाशी संबंधित विविध सामाजिक व आर्थिक समस्या मांडण्यात आल्या. आंदोलनाच्या प्रमुख मागण्यांमध्ये पोट खराब जमिनींची दुरुस्ती, पंतप्रधान घरकुल योजनेतील हप्त्यांचे वेळेवर वितरण, श्रमिक श्रवणबाळ व निराधार लाभार्थ्यांचे मानधन वेळेवर देणे, घरकुल लाभार्थ्यांना वाळूचे वाटप, तसेच पंतप्रधान व ▶▶ उर्वरित पान २ वर

# विविध मागण्यासाठी रिपब्लिकन पार्टी व भीमशक्ती संघटने कडून अंबाजोगाईत आक्रोश मोर्चा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दिवाळी पासून निराधारांच्या बँक खात्यावर एकही रूपया जमा नाही. त्यांना मानधन मिळाले नाही. याच्या निषेधार्थ गुरूवार, दिनांक २६ जुन रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालयावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट), भिमशक्ती यांनी काढलेल्या आक्रोश मोर्चाने अंबाजोगाई शहर दणाणले. निषेधाच्या घोषणा देत, झेंडे आणि फलक घेऊन शेकडो स्त्री, पुरूष व ज्येष्ठ नागरिक या मोर्चात सहभागी झाले.



या मोर्चा आंदोलनाबाबत बोलताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांनी सांगितले की, आमच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिनजी खरात, भिमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री खासदार चंद्रकांतजी हांडोरे यांच्या नेतृत्वाखाली अंबाजोगाईत गुरूवार रोजी तहसील कार्यालयावर आक्रोश म ोर्चा काढण्यात आला. या संदर्भात आम्ही प्रशासनाला निवेदन देवून पुर्व कल्पना दिली होती. गुरूवारी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) आणि भिमशक्तीच्या वतीने दोन स्वतंत्र निवेदने देण्यात आली. दोन ही निवेदनांत नमूद केले आहे की, १) संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, दिव्यांग बांधवांना ३०००/- रूपये प्रति महिना मानधन वाढ ▶▶ उर्वरित पान २ वर

## 'महिला आर्थिक विकास महामंडळाकडून लाडकी बहीण पतसंस्था सुरु होणार'

**बीड । प्रतिनिधी**

महिलांच्या आर्थिक सक्षम ीकरणासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यम ातून बीड जिल्ह्यात लाडकी बहीण पतसंस्था सुरू करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांकडून ७०० रुपयांचे शेअर्स आणि १०० रुपये सभासद शुल्क घेण्यात येणार आहे. त्यानंतर त्या पतसंस्थेच्या सदस्य बनतील. सदस्य झाल्यानंतर त्या महिला आपली रक्कम सुरक्षितपणे जमा करून स्वतःच्या गरजेनुसार कर्जरूपाने खेळते भांडवल मिळवू शकतील. अनेक महिलांना बँकेत खाते काढणे, कर्ज मिळविणे अथवा ▶▶ उर्वरित पान २ वर




# सर्वसामान्य नागरीकांना सुविधा पुरविण्यासाठी नगर परिषदेने तत्पर रहावे - अमरसिंह पंडित

## २ कोटी रुपये किंमतीच्या विकास कामांचा शुभारंभ

**गेवराई । प्रतिनिधी**

नगरपरिषदे सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी काम करत असते नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत तसेच व्यापारी वर्गाला देखील सुविधा मिळाल्या पाहिजेत हाच हेतू ठेवून नगरपरिषद काम करत असते. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कसलेही राजकारण न करता सर्वसामान्यांच्या आणि व्यापारी वर्गाच्या सेवेसाठी तत्पर राहावे असे प्रतिपादन माजी आम दार अमरसिंह पंडित यांनी केले. गेवराई नगर परिषदेच्या वतीने



शहरामध्ये नगर परिषदेच्या विविध विकासकामांचा शुभारंभ करताना ते बोलत होते. गेवराई ▶▶ उर्वरित पान २ वर

# सरकार देवस्थानांवर मेहेरबान मात्र ज्ञानमंदिर आणि आरोग्य मंदिराकडे दुर्लक्ष

## • मंदिर विकासाप्रमाणेच ज्ञानमंदिर, आरोग्य मंदिरासाठीही निधी द्यावा

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील महायुती सरकार देवस्थानांवर चांगलेच मेहेरबान असुन मागील वर्षात मराठवाड्यात तीर्थक्षेत्र क आणि ब मधील ५५९ देवस्थानांच्या विकासासाठी ६२ कोटींचा खर्च होत आहे. तथापि सद्यस्थितीत ५५९ पैकी १२० कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत तर १७८ कामे अद्याप सुरू होण्याच्या प्रतिक्षेत आहेत.मंदिर विकासांची कामे होत असल्याने भाविक भक्तांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.



याचवेळी देवस्थानांच्या विकासाला महत्त्व देतानाच मुलांच्या शिक्षणासाठी उपयुक्त ज्ञानमंदिरे आणि आरोग्य सुविधा पुरवणारी आरोग्य मंदिराकडे मात्र सरकारचे दुर्लक्ष होत असुन देवस्थानांच्या विकासाबरोबरच गावातील शाळा आणि आरोग्य केंद्राच्या विकासासाठी ग्रामस्थ आणि पुढा-यांनी पुढाकार घ्यावा आणि सरकारने यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

मराठवाडा संतांची भूमी म्हणून ओळखली जाते.याठिकाणी मठ, मंदिर आणि देवस्थानांची संख्या आधिक आहे. अनेक गावात ३-४ नावाजलेली देवस्थाने आहेत.त्यांचा विकास व्हावा यासाठी संबंधित ग्रामस्थ कायम प्रयत्नशील असतात.अशाच ५५९ देवस्थानांच्या विकास कामाला सरकारने मागील वर्षी मंजुरी दिलेली ▶▶ उर्वरित पान २ वर

## मद्याची दुकाने, बिअर बार यांवरील देवतांची नावे केव्हा बदलणार ?

४ जून २०१९ या दिवशी महाराष्ट्र सरकारने मद्याची दुकाने, बियर बार आणि परमिट रूम्स यांना देण्यात आलेली देवीदेवता, राष्ट्रपुरुष, संत, गड-किल्ले यांची नावे बदलण्यात यावी असा शासन आदेश काढला. या आदेशाला आज ६ वर्षे उलटली तरी राज्यातील अनेक बिअर बार आणि मद्याच्या दुकानांवरील श्रद्धास्थानांची नावे अद्याप पालटली गेली नसल्याचे दिसून येत आहे. शासनाच्या या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याऐवजी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकार्यांनी सदर आदेशच मागे घेण्यासाठी शिफारस केल्याचा धक्कादायक प्रकार गतवर्षी एका माहितीच्या माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या माहितीद्वारेउघड झाला होता. भाविक, राष्ट्रप्रेमी आणि शिवप्रेमी यांच्या श्रद्धेचा सन्मान राखण्याऐवजी बार मालकांची वकीली करणार्या उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकार्यांवर महाराष्ट्र शासनाने कठोर कारवाई करावी अशी मागणीही हिंदुत्ववादी आणि राष्ट्रप्रेमी संघटनांनी त्यावेळी केली होती. या गोष्टीला आता वर्ष उलटले तरीही परिस्थिती जैसे थे आहे. दुकाने आणि बार यांची नावे बदलण्यासाठी अनेक शासकीय विभागांकडे पत्रव्यवहार करावा लागतो. कमी कालावधीमध्ये हे करणे शक्य नाही. त्यामुळे हा आदेशच रद्द करण्यात यावा आणि नवीन नावे देतांना श्रद्धास्थानांची नावे न देण्याची सुधारणा विभागाने सुचवली आहे. मुळातच हा आदेश निघून आज सहा वर्षे उलटली असताना राज्य उत्पादन शुल्काला आणखी किती वेळ हवा आहे ? नियमाची अंमलबजावणी करणे हे अधिकार्यांना बंधनकारक आहे. त्यामुळे उत्पादन शुल्क विभागाने शासनाजवळ बार मालकांची वकिली न करता शासनाच्या आदेशानुसार कठोर कार्यवाही करणे अपेक्षित असताना तसे काही घडताना दिसत नाही. वरील आदेश निघाल्यानंतर प्रशासनाकडून तत्परतेने कारवाईला सुरुवातही करण्यात आली होती. या आदेशाचे पालन करताना राष्ट्रपुरुष म्हणून कोणती नावे ग्राह्य धरण्यात यावीत यासंबंधी विद्यमान पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांच्या नावासह ५६ नावांची जंत्री सोबत जोडण्यात आली होती, त्याचसोबत १०५ गड आणि दुर्गांची सूचीही देण्यात आली होती त्यामुळे कार्यवाही करण्याबाबत अधिकाऱ्यांमध्येसुद्धा स्पष्टता आली होती; मात्र देवता म्हणून कोणती नावे ग्राह्य धरावीत याबाबत कोणतीच सुस्पष्टता नसल्याने मद्याची दुकाने, परमिट रूम्स आणि बिअर बार यांना आजही देवतांची नावे दिलेली अनेक ठिकाणी दिसून येतात. देवतांच्या नावाची सूची आदेशात देण्यात आली नसल्याने कारवाईसाठी गेलेल्या अधिकाऱ्यांना संबंधित आस्थापनांचे मालक दिलेली नावे ही त्यांच्या नातेवाईकांपैकी कुणाची तरी असल्याचे सांगतात. देवतांच्या नावांबाबत स्पष्टता नसल्याने अधिकाऱ्यांमध्येही संभ्रम निर्माण होतो. परिणामी कारवाई करण्यावर बंधने येतात. अशी कारणे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आली होती. धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाव अथवा चित्र असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि शक्ती कार्यरत असते. त्यामुळे मद्याची दुकाने, परमिट रूम्स आणि बिअर बार्स यांसारख्या आस्थापनांना त्यांची नावे दिल्याने देवतांचा अवमान होतो. हा अवमान थांबवण्यात यावा यासाठी धार्मिक असेच हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी अनेक वर्षे आंदोलने केल्यामुळेच सरकारला आदेश काढून यांवर कारवाई करणे भाग पडले होते; मात्र ही कारवाई तोंडदेखली होती आणि शासनाला या बाबीशी काही देणेघेणे नव्हते हे आज ६ वर्षानंतर लक्षात येत आहे. आजमितीला राज्यात सत्तेत असणाऱ्या ३ पक्षांपैकी दोन प्रमुख पक्ष हिंदुत्वनिष्ठ विचारांचे आहेत. त्यांनी याप्रकरणी तत्परतेने लक्ष घालून देवतांची नावे संकलित करून ती सुधारित आदेशात जोडावीत आणि देवतांचा होणारा अवमान थांबवावा !

–जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

पान ४ वरून पुढे...

### दहावी, बारावी...

संपेपर्यंतच्या कालावधीपर्यंत चालू ठेवण्यासाठी प्रतिबंध करण्यात येत आहे. शासकीय व परीक्षेसंबंधित कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहनाव्यतिरिक्त इतर अनाधिकृत वाहनांना परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम, मयताची अंत्ययात्रासाठी लागू राहणार नाहीत, असेही आदेशात नमूद आहे. बीड जिल्हयाच्या हद्दीतील परीक्षा केंद्राचे १०० मी परिसरात व परीक्षा साहित्य ठेवलेल्या ठिकाणी ०८ जुलैपर्यंतच्या कालावधीत त्या-त्या दिवशीच्या परीक्षेच्या वेळेच्या एक तास अगोदर ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीसाठी आदेश लागू राहतील, असेही आदेशात नमूद आहे.

### अंबाजोगाईत अश्व...

निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी बाल वारकरी वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. लहान व मोठ्या गटात झालेल्या या स्पर्धेत विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून विठ्ठलभक्ती, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती व प्लास्टिक मुक्ती यांसारख्या सामाजिक संदेशांची प्रभावी मांडणी केली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. हा सोहळा वारकऱ्यांच्या भक्तीभावाची साक्ष देणारा ठरला असून अंबाजोगाईतील अशा कार्यक्रमांनी संत परंपरेचा वारसा सन्मानाने जपला जात असल्याचे स्पष्ट झाले.

### नराधम शिक्षकांना...

व राजकीय प्रतिष्ठित असून त्यांच्याकडून असे गैरकृत्य होणे समाजाला अपेक्षित नाही. परंतु अशा हीन मानसिकतेच्या नराधमाला समाजात राहण्याचा कोणताही अधिकार नाही . अशा विकृत लोकांमुळे समाजात चुकीचा संदेश जातो. हजारो विद्यार्थी एका ठिकाणाहून भविष्य घडवण्यासाठी स्वप्न पाहत आहेत त्याच ठिकाणी असे घाणेरडे प्रकार होत असतील तर पालकांनी काय करावे असा प्रश्न उपस्थित होत असून या दोन्ही आरोपींना पोलिसांनी तात्काळ अटक न केल्यास जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर १ जुलै २०२५ रोजी धरणे आंदोलन करणार असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी निवेदनात म्हटले आहे.

### राजर्षी शाहुजी...

फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. प्रमुख व्याख्याते उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांनी बोलताना छत्रपती शाहू महाराज यांचा जीवन कार्य उलगडून दाखवत असताना त्याचे अनेक पैलू आजच्या सामाजिक परिस्थिती मध्ये लागू कसे करता येतील यावर विचार मंथन केले. छत्रपती राजर्षी शाहू महाराज व घटनाकार संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे परस्पर संबंध कसे होते. याचा उहापोह उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांनी केला. छत्रपती शाहू महाराजांच्या लोककल्याणकारी राज्यात सर्व प्रजा सुखी होती समाधानी होते शेतकरी आनंदाने जगत होता. मात्र आजची राजकीय परिस्थिती सामाजिक परिस्थिती पाहीली तर सर्वत्र हातास चित्र दिसत आहे सर्वसामान्य जनता महागाईने त्रस्त झालेली आहे जाती धर्मांच्या देशामुळे भारत हे अखंड राष्ट्र

पान ४ वरून पुढे...

फुटीच्या मार्गावर जात आहे. की, काय अशी शंका येत आहे छत्रपती शाहू महाराजांनी तसे लोक कल्याणकारी राज्य उभारले तसे आजच्या राज्यकर्त्यांना ते राज्य उभा करणे का जमत नाही..? असा सवाल उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांनी केला. आपले अध्यक्षीय समारोपपर मनोगत व्यक्त करताना डॉ.राजेश इंगोले यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, शेती, अर्थ विषयक विचार हे सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विचार करून केलेले होते. त्यामुळे शाहू महाराजांची राज्य हे खऱ्या अर्थाने लोकराज्य होते लोककल्याणकारी राज्य होते. छत्रपती शाहू महाराजांच्या अलौकिक कार्य केवळ सर्वसामान्य वंचित उपेक्षित घटकांसाठी होते त्यामुळे छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने 'वंचितांचे लोकनायक' होते असे गौरवोद्गार डॉ.राजेश इंगोले यांनी केले. समितीचे कार्यकारी अध्यक्ष बी.के.मसने यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या जीवनामध्ये रयतेला महत्त्वाचे स्थान दिले होते त्यामुळे त्यांना लोकर्षी म्हणतात असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमच्या यशस्वितेसाठी महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ. राजेश इंगोले, कार्यकारी अध्यक्ष बी.के.मसने, उपाध्यक्ष रामेश्वर खाडे, सचिव रत्नदीप गोरे, कोषाध्यक्ष संजय साळवे, डॉ.मिलिंद ढगे, संघटक सुनिल नरसिंगे, भाऊराव गवळी तसेच राजकुमार साळवी, प्रा.आदित्य कदम, प्रा.तुषार करपुडे, हेमंत धानोरकर, ताटे, किरण नरसिंगे, यांनी परिश्रम घेतले. यावेळी डॉ.कमलाकर राऊत, भीमाशंकर शिंदे, कलढेले, प्रा.राहुल सुरवसे, नितीन सरवदे, अजिंक्य बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बारावी परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या कु.स्नेहा साळवे तसेच कु.वैष्णवी काळे या गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.किरण चक्रे, तर पाहुण्यांचा परिचय गणेश कदम यांनी करून दिला, सूत्रसंचालन प्रा.अनिल नरसिंगे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.मिलिंद ढगे यांनी मानले.

### जिल्हा परिषद...

शिष्यवृत्ती परिक्षा, एनएमएनएस परिक्षा, विज्ञान प्रदर्शन, कला - क्रीडा स्पर्धा, आनंद मेळावा, शैक्षणिक सहली, महिला पालक मेळावे, बालवृक्ष दिंडी, शालेय व वर्ग मंत्रिमंडळ निवडणूक यांसारखे उपक्रम नियमित प्रशालेत राबवले जातात, या शाळेची सुंदर रचना, उत्कृष्ट शिकवण आणि सर्वांगीण विकास याचा परिपाठ राबवते आहे. आज वेगवेगळ्या भागात अनेक प्राथमिक शाळांची अवस्था दयनीय आहे, मात्र जिल्हा परिषद कन्या प्रशाला याला अपवाद ठरते. शिक्षण हीच खरी शक्ती आहे हे पुन्हा सिद्ध करणारी ही शाळा खऱ्याअर्थाने गुणवत्तेचं खणखणीत नाणं आहे आणि जिल्हा परिषद शाळा हेच अस्सल सोनं हे सत्य अधोरेखित करते. अशा या सर्वगुणसंपन्न व आदर्श शाळेची पीएम श्री शाळेसाठी निवड झाली आहे. जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी, ता. आष्टी, जि. बीड ची पीएम श्री शाळेसाठी निवड झाल्याबद्दल शाळेतील आदर्श शिक्षक - शिक्षिका आबासाहेब खताळ (मुख्याध्यापक), सतिश दळवी, श्रीम. सुरेखा कुटे, श्रीम. संगिता दहिफळे, सुरेश नरोड, श्रीम. स्वाती टेकाडे, श्रीम. नाजिया बागवान, भोकरे संजय, विठ्ठल जगताप, श्रीम. लतिका तरटे, राजेंद्र लाड, दत्तात्रय गाडेकर, देविदास शिंदे, आप्पासाहेब काळे, श्रीम. आशा शिंदे, श्रीम. रुक्मिण करपे, शिवाजी आव्हाड, श्रीम. अश्विनी धस, श्रीम. रोहिणी कार्ले, संतोष खंडागळे, राजेंद्र शेळके, शरद राऊत, श्रीम. धोंडे मनिषा, श्रीम. धोंडे अर्चना, चित्रकला शिक्षिका श्रीम. कोमल थेटे, संगित शिक्षिका श्रीम. सुनिता पोकळे, व्यावसायिक शिक्षक भागवत

पान ४ वरून पुढे...

वायाळ, श्रीम. शितल जगताप, मुख्यमंत्री युवा शिक्षिका कु. अमृता जोशी तर आदर्श सेवक संतोष धोंडे, श्रीम. सावित्रा जाधव यांचे शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीम. सुजाता झगडे व सदस्य श्रीम. प्रभा वायकर, श्रीम. समरीन काझी, श्रीम. जयश्री धोंडे, श्रीम. अश्विनी घालमे, श्रीम. विद्या डोंगरदिवे, श्रीम. अनिता लांबडे, श्रीम. उज्वला धोत्रे, कु. जैनब शेख, कु. नम्रता भवर, श्री. लक्ष्मण रेडेकर सर, श्री. डॉ. नदीम शेख साहेब आदींनी अभिनंदन करुन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### अंबाजोगाई येथील...

प्राध्यापक-कर्मचाऱ्यांची मोलाची साथ असल्यानेच फारच कमी वेळात योगेश्वरी पॉलीटेक्निक कॉलेज मराठवाड्यात तर पहिल्या क्रमांकावर राहत नावारुपाला आले आहेच. परंतु आता महाराष्ट्रातील नामांकित पॉलीटेक्निक कॉलेज सोबत अंबाजोगाईच्या योगेश्वरी पॉलिटेक्निक कॉलेजची तुलना होत आहे. याचा फार मोठा आनंद होत असल्याची भावना प्रा.नारायण सिरसाट यांनी बोलून दाखवली. या महाविद्यालयातील प्रा. नारायण सिरसाट यांचे सिरसाट कोचिंग क्लासेस नावाने गणित विषयाचे खाजगी ट्युशन चालते. शालेय जीवनापासून गणित पक्के असल्याने आणि स्वतःचे अभियांत्रिकी शिक्षण घेतानाही सातत्याने गणित विषयात पैकीच्या पैकी मार्क घेणारे नारायण सिरसाट यांचे गणित शालेय जीवनापासूनच अगदी पक्के होते. स्वतः ट्युशन घेत-घेत सिरसाट हे पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये सुद्धा प्राध्यापक म्हणून काम करतात. कॉलेजच्या सुरुवातीपासूनच त्यांच्या विषयामध्ये बहुतांशी विद्यार्थी प्राधान्याने प्राविण्याने आहेत. परंतु यावर्षी मिळवलेले यश मात्र अगदीच उल्लेखनीय आणि नोंदीव आहे. याचे कारण ही तसेच आहे. प्रा. नारायण शिरसाट यांच्याकडे खाजगी ट्युशन लावलेले पॉलीटेक्निक कॉलेजच्या २० विद्यार्थ्यांनी गणित विषयात १०० पैकी १०० गुण घेऊन कॉलेजच्या निकालात मोलाची भर घातली आहे. त्यामुळे यश संपादन केलेल्या यशवंत विद्यार्थ्यांसह योगेश्वरी पॉलिटेक्निक कॉलेजच्या सातत्यपूर्ण यशासह प्रा. नारायण सिरसाट यांच्या सिरसाट कोचिंग क्लासेसची आणि वैयक्तिक प्रा. सिरसाट यांची चर्चा मात्र संपूर्ण मराठवाडाभर होत असून योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष-सचिव, संचालक मंडळासह प्राचार्य-उपप्राचार्य, संपूर्ण प्राध्यापक व कर्मचारी, विशेष करून विद्यार्थ्यांचे पालक यांच्यासह समाजातील सर्वच स्तरातून प्रा.नारायण सिरसाट यांच्यावरती कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### लिंबागणेश येथील...

पाहणी करत संवाद साधत, सुचना फलक लावण्याच्या सुचना देत संबंधित कंत्राटदार आणि राष्ट्रीय महामार्ग आधिका-यांना लेखी पत्रकाद्वारे कळविण्यात येणार असल्याचे सांगितले. गेल्या ३-४ वर्षांपासून डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी रास्तारोको, अपघातातील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली आदी लक्ष्यवेधी आंदोलने करण्यात आली होती.तर. ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांनी दि.१६ जुन रोजी आत्मदहनाचा इशारा दिल्यानंतर कंत्राटदाराने तात्पुरता स्वरूपात रंबलिंग स्ट्रीप मारून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला होता.मात्र हरिओम क्षीरसागर यांनी त्याचा फारसा परिणाम होत नसल्याने गतिरोधकाची मागणी लावून धरत दि.२५ जुन रोजी आमदार आपल्या गावी, आपल्या दारीविशेष मोहिमेंतर्गत आ. संदिप क्षीरसागर यांच्या कार्यक्रमात बेलगाव याठिकाणी गतिरोधकाचा मुद्दा लावून धरत पाठपुरावा केला.

पान १ वरून पुढे...

### जालना येथील...

शासनाकडे पाच तहसीलदारांचा अहवाल पाठवला असून यांच्यावर घोटाळा प्रकरणी ठपका ठेवण्यात आला आहे विशेष म्हणजे राज्य शासनाने या तहसीलदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची शिफारस करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर जिल्हाधिकारी यांनी नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालात बनावट शेतकरी दाखवून, तसेच जमीन नसताना आणि एकाच नावावर दोनदा अनुदान लाटल्याचा प्रकार समोर आला होता. जिल्ह्यात २०२२ ते २०२४ या कालावधीत अतिवृष्टी आणि गारपिटीच्या शेतकऱ्यांसाठी मंजूर अनुदानात सुमारे ४२ कोटींचा अपहार प्रकरण गाजले होते. जालना जिल्ह्यात घडलेल्या या घटनेमुळे राज्यात एकच माजली होती या प्रकरणाची संपूर्ण चौकशी जिल्हाधिकारी पांचाळ यांनी स्वतः केली या प्रकरणात आतापर्यंत तलाठी मंडळ अधिकारी सह महसूल विभागातील कर्मचाऱ्यावर संक्रात आली आहे. अनेक कर्मचारी चौकशीच्या फेऱ्यात तर अनेकांचे निलंबन झाले असून शासनाची फसवणूक करणाऱ्या तहसीलदारावर व कर्मचाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची शिफारस व अहवाल राज्य शासनाकडे पाठवण्यात आला आहे. अंबडचे तत्कालीन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे नावही राज्य शासनाकडे कारवाई करण्यासाठी पाठवले असल्याने बीडच्या तहसीलदार पदी कार्यरत असणाऱ्या तहसीलदार चंद्रकांत शेळके गोत्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### शिवछत्र परिवार...

संपन्न झाले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, सत्ता ही लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी असून त्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील आहोत. येत्या काळात शहरातील रस्ते, नाल्या व सार्वजनिक मैदान यांना कंपाऊंड वॉल चे कामे मोठ्या प्रमाणात केली जाणार आहेत. यासाठी नागरिकांनी आपल्या भागातील विकासकामे करण्यासाठी संपर्क करावा. असे आवाहन त्यांनी केले. यावेळी संजय दाभाडे, सोमनाथ गायकवाड, बाळासाहेब दाभाडे, मुन्ना कोकाटे, रवी ढाकणे, सुनील पारे, भारती सर, काशीनाथ गोगुले, खरात सर, माळी सर, गवळी सर, शूभम कदम, सौंदाने सर, नारायण जाधव, जगदीश काळे, सौ.पल्लवी गोगुले, सौ. वंदना खरात, सौ.अलका उगले, सौ.अणुराधा भारती, सौ.वंदना घोलप, सौ. वाघमारे, सौ.गोडबोले, सौ. पुजा भोसले, सौ.देवढे, सौ.शिनगारे, सौ. हुळजूते, सौ. गवळी यांच्या सह परिसरातील महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राज्यातील ५१...

निरीक्षक शाखा पोलीस अधीक्षकपदी असलेल्या तेजस्वी सातपुते यांची समादेशकपदी बदली करण्यात आली आहे. पुणे राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ पदावर त्यांना नियुक्ती देण्यात आली आहे. तर, महेंद्र पंडित यांची स्तंभ २ मधून स्तंभ ३ मध्ये नमूद पदावर बदली करण्यात आली आहे. त्यानुसार, महेंद्र पंडित यांना बृह्नमुंबई पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यभरातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून तब्बल ८१ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून ५१ IPS अधिकार्यांना काहींना प्रमोशन तर काहींचे डिमोशन करुन बदली करण्यात आली आहे. पुण्यातील परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांची

पान १ वरून पुढे...

पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा येथे बदली करण्यात आली असून वाहतूक पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांची देखील बदली करण्यात आली आहे. सरकारच्या नव्या बदली आदेशान्वये पुण्यामध्ये तीन नव्या आयपीएस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. दरम्यान, राज्यात गेल्या १५ दिवसांपूर्वी ८ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यानंतर गेल्या आठवड्यात पुन्हा चार आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश जारी करण्यात आले होते. त्यामध्ये मुंबई मेट्रो क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांची वर्ध्याच्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी बदली करण्यात आली आहे. तर अमरावतीचे आयुक्त सचिन कळंत्रे यांची बदली पुण्यातील यशदाचे उपसंचालकपदी करण्यात आली. त्यानंतर, आता ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्याआहेत. कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक तुषार पाटील यांची मुंबईत पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, विजय पवार, सुनिल लोखंडे, नम्रता पाटील आणि स्मिता पाटील यांची मुंबईतील पोलीस उपायुक्त पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. म्हणजेच मुंबईतील पोलीस उपायुक्त पदावर ५ आयपीएस अधिकाऱ्यांची पदोन्नतीवर नेमणूक करण्यात आली आहे.

### वंचित बहुजन...

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनांमधील बोगस कामांची गंभीर चौकशी व त्यावर कठोर कारवाई यांचा समावेश होता. तसेच, पाटोदा तालुक्यातील दलित वस्तीतील सार्वजनिक बांधकामांची वेळोवेळी चौकशी करून भ्रष्टाचार रोखण्याची मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली. या मागण्यांवर प्रशासनाकडून त्वरित लक्ष दिले जाण्याचे आदेश आंदोलनात नमूद करण्यात आले. तहसील कार्यालयाने आंदोलनाच्या निवेदनाची दखल घेत, संबंधित विभागांना पत्रे व स्मरणपत्रे पाठवून आवश्यक ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. काही प्रकरणांत वरिष्ठ कार्यालयाकडे समिती स्थापन करण्यासाठी पाठविण्याची तयारी असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. तहसीलदारांनी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना चर्चेसाठी बोलावले असून, पुढील संवादातून प्रश्न सोडविण्याचा विश्वास व्यक्त करत आंदोलन शांततेत स्थगित करण्याचे आवाहन केले आहे. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, दीपक थोरात, आप्पासाहेब देवडे, बळीराम ससाने, सतीश इनकर, सिद्धार्थ आगे, अमर वारभवन, महेश वाघमारे, राम पारखे आणि मोठ्या संख्येने महिला कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला.

### विविध मागण्यासाठी....

करा., २) तहसिल कार्यालयाकडून वयोवृध्द लाभार्थी यांची केवायसी, डिबीटीच्या नांवाखाली होणारे हेलपाटे थांबवावे व जाचक अटी रद्द कराव्यात., ३) शासन आपल्या दारी योजनेखाली तहसिल कार्यालयामार्फत वयोवृध्द लाभार्थी ज्यांचे अंगठा (थंम्ब) लागत नाहीत. त्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन यादी तयार करून त्यांना तात्काळ लाभ द्यावा. आणि ४) संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेमध्ये निकष निवडीसाठी रू.२१,०००/- ची अट रद्द करून ती रू.५०,०००/- पर्यंत करावी या मागण्यांचा समावेश आहे. सदरील निवेदनाच्या प्रतिलिपी - १) जिल्हाधिकारी, बीड., २) उपविभागीय अधिकारी आणि ३) पोलीस निरीक्षक, शहर पोलीस स्टेशन अंबाजोगाई यांना देण्यात आल्या आहेत. अंबाजोगाई तालुक्यातील २७ हजार निराधार हे त्यांच्या हक्काच्या

पान १ वरून पुढे...

अनुदानापासून वंचित आहेत. त्यामध्ये संजय गांधी निराधार, श्रावणबाळ निराधार, दिव्यांग बांधवांसाठी शासनाकडून दिले जाणारे मानधन हे मागील ९ महिन्यांपासून तहसिल प्रशासनाच्या दप्तर दिरंगाईमुळे मिळालेले नाही. या सर्व योजनेमध्ये लाभार्थी असणारे बहुसंख्य लोक हे वयोवृध्द असल्यामुळे त्यांना तहसील कार्यालयामध्ये खेटे मारावे लागत आहेत. निराधार लोकांना मिळणारे मानधन नेमके कोणत्या कारणामुळे थकविले गेले आहे. याचे समाधानकारक उत्तर तहसिल कार्यालयाकडून मिळत नसल्यामुळे आज गुरूवार, दिनांक २६ जुन रोजी सकाळी ठिक ११:३० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथून आक्रोश मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा तहसिल कार्यालय, अंबाजोगाई येथे धडकला. मोर्चेकऱ्यांना अक्षय युवराज भुंबे, जीवन गायकवाड, धीमंत राष्ट्रपाल आणि मुक्ता पाडुळे (संवेदना फेलो) यांनी संबोधित केले. यावेळी सदरील मागण्यांचे निवेदन तहसिलदार विलास तरंगे यांनी स्विकारले. या मोर्चाचे आयोजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट), भिमशक्ती संघटना यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी मोर्चेकऱ्यांचे नेतृत्व भिमशक्ती संघटनेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय युवराज भुंबे, बीड जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड, भिमशक्तीचे बीड जिल्हा संघटक धीमंत राष्ट्रपाल यांनी केले. तर मोर्चाच्या यशस्वितेसाठी भिमशक्तीचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष सुमित आवाडे, मुक्ता पाडुळे (संवेदना फेलो), मिनाताई लोंढे, रेखाताई मस्के, मुक्ता पाडुळे, नितीन गोदाम, बादल तरकसे, विशाल बनसोडे, शंकरदादा उजगरे, शेरूभाई पठाण, लखन गायकवाड, राम गायकवाड, अमन कोकाटे यांनी पुढाकार घेतला.

### ‘महिला आर्थिक...

व्यवसाय सुरू करताना आर्थिक नियोजन करणे कठीण जाते. त्यांच्यासाठी ‘लाडकी बहीण पतसंस्था’ एक विश्वासार्ह आणि सहजसोपे व्यासपीठ ठरणार आहे. या संस्थेच्या माध्यमातून महिलांना केवळ बचतच नव्हे, तर स्वावलंबनाची नवी दिशा मिळेल, असे महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. बीड जिल्ह्यात लाडकी बहीण पतसंस्था बाबत प्रक्रिया सुरू केली आहे. या पतसंस्थेत केवळ लाडकी बहीण योजनेतीलच नाही तर महिला आर्थिक विकास महामंडळ बचत गटातील विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता आणि दिव्यांग महिलांनाही सामावून घेतले जाणार आहे. महिलांची बचतीची सवय वाढावी व त्यांना व्यवसायासाठी त्वरित कर्ज कमी व्याजदरात उपलब्ध व्हावे यावर भर दिला जाणार असल्याचेही जगताप यांनी कळविले आहे.

### सर्वसामान्य नागरीकांना...

वतीने रुपये १ कोटी ५० लक्ष रुपये किंमतीच्या व्यापारी संकुल बांधकामाचा तसेच नविन बसस्थानक ते चार्वाक हॉटेल पर्यंत सिमेंट कॉंक्रिट नाली बांधकामाचा शुभारंभ जयभवानी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आला. यावेळी भवानी बँकेचे चअरमन बप्पासाहेब मोटे, माजी नगराध्यक्ष विनोद सौंदरमल, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, माजी नगरसेवक जालिंदर पिसाळ, राधेशाम येवले, कृष्णा मुळे, मंजुर बागवान, विलास सुतार, आवेज शरीफ, सय्यद नजीब, उत्तमराव सोलाने, रिपाईचे

पान १ वरून पुढे...

तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, संजय पुरणपोळे, बंटी सौंदरमल, धमपाल भोले, ॲड. योगेश पाटील, ॲड. गौतम कांडेकर, ॲड. मनोज हजारे, दत्ता दाभाडे, संतोष आंधळे, मानवी हक्क अभियानचे कडुदास कांबळे, मोहसिन बागवान, सुभान शेख, सुभाष गुंजाळ, विलास ठाकुर, दत्ता लाड, संतोष सुतार, वसीम फारोकी, जे.के. बाबुभाई, अक्षय पवार, संदिप मडके, रजनी सुतार, बाबा शेख, राजाभाऊ जवंजाळ, कमलाकर हातागळे, दादासाहेब चौधरी, खालेद कुरेशी, सतिष दाभाडे, विलास निकम, सुनिल सुतार, शाम सुतार, नविद मशायक, सादेक शेख, बाळराजे सोनकांबळे, अन्सारी आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. पूढे बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, गेवराई शहराचे अर्थकारण मजबुत करण्यासाठी शहराला जोडणारे रस्ते झाले पाहिजेत. गेवराई शहराच्या प्रत्येक भागाचा विकास झाला पाहिजे असेही ते यावेळी म्हणाले.

### सरकार देवस्थानांवर....

आहे.मंजुरी दिल्यानंतर अनेक ठिकाणी तातडीने कामे सुरू करण्यात आली असुन यातील १२० कामे पूर्ण करण्यात आली आहेत.याठिकाणी मंदिर परीसराचे सुशोभीकरण, सभामंडप, पिण्याच्या पाण्याचा हौद, पेव्हर ब्लॉक, विद्युतीकरण अशी आवश्यकतेनुसार कामे करण्यात येत आहेत.

संतांची भूमी असलेल्या मराठवाड्यात देवस्थानांची संख्या आधिक आहे .सप्ताह,यात्रा आदि कार्यक्रम होत असल्याने लोकं एकत्र येतात. गाठीभेटी होतात,विचारांची देवाणघेवाण होते.यामुळे देवस्थानांच्या विकासाला महत्त्व दिलेच पाहिजे.परंतु याचवेळी गावातील शाळांना मुलभूत सुविधा आणि आरोग्य सुविधा पुरवणाऱ्या आरोग्य केंद्रांच्या विकासासाठीही ग्रामस्थ आणि पुढा-यांनी पुढाकार घेऊन शासनाकडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे अशी भावना डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.

लातुर -५७-६७-४८-१८९
बीड -२२-२९-०८-८४
संभाजीनगर -१८-४१-२८-८७
धाराशिव -००-०६-७१-७७
जालना -२०-१३-०४-३७
परभणी -००-५१-००-५१
हिंगोली -००-११-००-११
नांदेड -०३-२५-१९-४८

तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत ३ वर्ग क साठी ३९२४.७२ लाख रुपये तर ४ ब वर्ग तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमासाठी २३९४.२९ लाख रूपयांचा निधी मंजूर असुन आतापर्यंत यातील ४२ टक्के निधी खर्च झालेला आहे.उपलब्ध उर्वरित निधी अखर्चित राहिल्याने तो शासनाकडे परत गेला तरी तो पुन्हा उपलब्ध होत आहे. मागील वर्षात ५५९ कामांना मंजुरी दिली होती.परंतु नव्याने सत्ता आल्यानंतर लाडकी बहिण योजनेसाठी निधी वळवल्यामुळे सरकारकडे निधीची वानवा असल्याने या वर्षात नविन मंजुरी देण्यात आली नाही.मात्र नव्याने मंजुरी मिळावी यासाठी मागील वर्षापेक्षा जास्त प्रस्ताव शासनाकडे आल्याची माहिती असुन शासनाकडे ढीगभर प्रस्ताव दाखल झाले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी त्यापैकी अनेक कामांना मंजुरी मिळण्याची शक्यता असुन त्यासाठी स्थानिक नेते मंडळी जोर लाऊन प्रयत्न करत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' असा राज्यकारभार करणारे रयतेचे राजे छत्रपती शाहू महाराज सदा सर्वकाळ वंदनीय आहेत : संतोष डोंगरे सर

## धम्मदीप बुद्ध विहार व वाचाल तर वाचालवाचनालयातर्फे विविध उपक्रम संपन्न करून छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

बहुजनांचा उद्धार शिक्षणाशिवाय होणार नाही हे विद्या विना मती गेली......' हे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांच्या थोर विचारांची आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारे व बहुजन हिताय बहुजन सुखाय या मूलमंत्र्यानुसार राज्यकारभार करणारे रयतेचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज सदा सर्वकाळ वंदनीय आहेत असे उद्गार सुप्रसिद्ध कीर्तनकार व संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे गाढे अभ्यासक प्रमुख वक्ते श्री संतोष डोंगरे सर यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना संबोधितांना प्रतिपादन केले.



धम्मदीप बुद्ध विहार बीड येथे बुद्ध विहार कमिटी, वाचाल तर वाचाल वाचनालयातर्फे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विनम्र अभिवादन कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष म्हणून महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जीएम भोले सर हे होते तर ह. भ. प. श्रीकृष्ण उबाळे सर प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. या कार्यक्रमास वाचाल तर वाचालचे संस्थापक अध्यक्ष डी जी वानखेडे, समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले, आयु. बि जी दळवी, डीएम राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती,

सर्वप्रथम तथागत, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती राजश्री शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला मान्यवरांच्या हस्ते अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले,ड तेजस वडमारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक करून बुद्ध विहारे हे संस्कार केंद्र व्हावीत या दिशेने पुढील वाटचाल राहील असे निर्धारपूर्वक सांगितले.

वरील निर्धारचाच एक भाग म्हणून वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाने बलभीम नगर परिसरातील १२ गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य( वही पेन) व छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती शाहू महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले,माता रमाई,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, संत गाडगेबाबा थोर शास्त्रज्ञ डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांचे जीवन चरित्र पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला तर वाचनालयाचे केंद्र असलेल्या ३८ वे केंद्र असलेले धम्मदीप बुद्ध विहार परिसरातील विद्यार्थ्यांकरीता ४ थ्या फेरीतील ५० पुस्तकांचा संच ३ महिने वाचनाकरिता ड तेजस वडमारे यांना मान्यवरांच्या हस्ते मुलांना वितरित करण्याकरिता सुपूर्द करण्यात आला.नवनिर्वाचित नौकरिस रुजू झालेले सय्यद शबनम रफिक व अभिजित सिरसाट यांचा पेन महापुरुषांचे जीवन चरित्र पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन धम्मदीप बुद्ध विहार व वाचनालयातर्फे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी छोटी बालिका तनिष्का वाघमारे हिने बाबासाहेबांच्या जीवनावर मंत्रमुग्ध करणारे सुरेल आवाजात गीत गायले याबद्दल अध्यक्ष जीएम भोले यांनी तिला ५० रुपये बक्षीस देऊन पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या. या सत्कार प्रसंगी नवनियुक्तांनी आपले मनोगत व्यक्त करून आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून चिकाटीने अभ्यास केल्यास यश नक्की मिळते असे भाओद्गार काढले, प्रमुख पाहुणे ह भ. प. श्रीकृष्ण उबाळे महाराज यांनी छत्रपती शाहू महाराज यांनी त्यांच्या जीवनात बहुजन हिताकरिता केलेल्या अनेक कार्यावर सखोल प्रकाश टाकून महाराजांच्या जीवनाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सध्या स्थिती जीवनाची वाटचाल ठेवणे हेच त्यांना जयंतीदिनी खरे विनम्र अभिवादन ठरेल असे स्पष्ट केले या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन निळकंठ (केके) वडमारे यांनी केले त्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व उपस्थित ४० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) व खाऊ वाटप केले. या कार्यक्रमास आयु. राज जाधव, प्रेम जोगदंड,यश गवळी, सरिता खेमाडे, कोमल वाघमारे, अंजली वडमारे व बलभीम नगर, शिवाजीनगर, मित्र नगर, पंचशील नगर, परिसरातील बालक बालिका व उपासक उपासिका मोठया संख्येने उपस्थित होते, राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बाजीराव पाटील विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

स्फुर्ती शिक्षण संस्था जांब संचलित बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जांब.शिरूर.(का) जि.बीड विद्यालयात दि.२६ जून २०२५ रोजी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम



खाडे तर प्रमुख अतिथी म्हणून भांगे सर व जायभाये सर हे उपस्थित होते.सर्व प्रथम राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .शाळेतील विद्यार्थ्यांने छत्रपती शाहू महाराज यांच्या जिवनावर भाषण केले सर्वप्रथम कु.आरती वाघमारे,कु.सिमरन शेख,कु अक्षरा सातपुते,चि .समाधान सातपुते,चि. सुरज सातपुते इ.या नंतर प्रमुख अतिथी भांगे सर यांनी शाहू महाराजांनी समाजातील वंचीत आणि उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याची प्रशंसा केली.

# ऑलिम्पिक स्पर्धेत खेळाडूंनी अधिकाधिक सहभाग नोंदवावा: प्रा.शेळके





**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी ऑलिम्पिक स्पर्धेत सहभाग नोंदवावा,असे मत शिवछत्रपत्री राज्य क्रीडा पुरस्कारार्थी प्रा. जे. पी. शेळके यांनी व्यक्त केले. जागतिक ऑलिम्पिक दिन जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे नुकताच (ता.२३) रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शेळके बोलत होते. या कार्यक्रमास जेष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात, जेष्ठ क्रीडा संघटीका जया बारगजे, श्री. अफरोज, श्री. पठाण, नितीन गर्जे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले तर आभार क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील यांनी मानले.

# सौ. के. एस. के. (काकू) कृषी महाविद्यालयाच्या कृषी दुतांचा माती परीक्षणाचा स्तुत्य उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत सौ. के. एस. के. (काकू ) कृषी महाविद्यालय म्हसोबा फाटा बीड येथील कृषीदूतांनी खामगाव या गावात जाऊन तेथील शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना माती परीक्षणाचे महत्त्व व फायदे समजावून सांगितले, तसेच माती परीक्षण केल्याने जमिनीत व मातीत असलेले घटक समजतात व पुढील पिकासाठी लागणारे खत व मातीत असलेले खतांचे किंवा नत्र, पलाश, पोटॅश यांसारख्या खतांचे प्रमाण समजून येते व पुढील पिकाचे व्यवस्थापन करण्यास मदत होते यासारखे फायदे शेतकऱ्यांना समजावून सांगितले व तेथील शेतकरी मुसा समशेर खान पठाण व जुबेर रहीम



खान पठाण यांच्या शेतात जाऊन माती परीक्षणासाठी माती कशी गोळा करावी याबद्दल शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक करून दाखविले, यावेळी शेतकऱ्यांना पडलेल्या प्रश्नांचे निवारण देखील कृषिदुतांनी केले. कार्यक्रमत यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कृषी दुतांना महाविद्यालयाचे सहसचिव डॉक्टर जी. व्ही. साळुंखे सर, प्राचार्य डॉक्टर. एस. पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. टी. शिंदे व उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक एस . व्ही. राठोड यांचे मार्गदर्शन लाभले व बीज माती विज्ञान आणि कृषी रसायनशास्त्र विभागाचे प्रा. बी. आर. चादर व प्रा. ए. जी. गरडी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# अंमलीपदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बीडच्या वतीने मध्ये अंमली पदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती शिबीर बीडच्या सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालयात काल (ता.२६) पार पडले. कार्यक्रमाच्या सुरूवातीस राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव रेणुका एम. सातव, प्राचार्य डॉ. महेंद्र गोशाल, डॉ. मुजाहिद ईस्माइल, तत्वशिल कांबळे, अशोक तांगडे, मिथुन जोगदंड, शामसुंदर शिंदे, ओंकार नाईकवाडे, रोहन दिवे उपस्थित होते. या शिबीरात महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आदी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. महेंद्र गोशाल यांनी केले. अंमली पदार्थ विरोधी जागरूकता आणि नशामुक्ती दिशादर्शक अंमली पदार्थ भारत योजना २०२५ (DWN POSH CT), समितीची स्थापना याबाबत श्रीमती सातव यांनी मार्गदर्शन केले. डॉ. मुजाहिद मोहम्मद यांनी व्यसनाचे दुष्परिणाम सांगितले. अशोक तांगडे यांनी सायबर सुरक्षा यावर मार्गदर्शन केले. तत्वशिल कांबळे यांनी व्यसनाचे दुष्परिणाम यावर मार्गदर्शन केले. ओंकार नाईकवाडे यांनी नालसा हेल्पलाईन नंबर १५१०० या विषयी मार्गदर्शन केले.

# राष्ट्रीय निबंध स्पर्धेत पांगरा शिंदे शाळेची श्वेता शिंदे तृतीय

**वसमत । प्रतिनिधी**

भारतीय इतिहास संकलन समिती महाराष्ट्र प्रांत यांच्यातर्फे डॉ.आनंदी गोपाळ जोशी स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील निबंध स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला.या राष्ट्रीय निबंध स्पर्धेत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पांगरा शिंदे या शाळेची विद्यार्थिनी कु.श्वेता संजय शिंदे हिने तृतीय क्रमांक मिळवला आहे.

डॉ.आनंदी गोपाळ जोशी यांच्या जीवनावर आधारित आयोजित करण्यात आलेली ही राष्ट्रीय स्तरावरील निबंध स्पर्धा शालेय विद्यार्थ्यांपासून ते



पदवीधर व वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी विविध विषयानुसार होती. या निबंध स्पर्धेत जि.प.कें. प्रा.शा.पांगरा शिंदे येथील शिक्षक श्री यादव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.नुकताच या स्पर्धेचा निकाल जाहीर झाला व निकालामध्ये पांगरा शिंदे शाळेची विद्यार्थिनी कु.श्वेता संजय शिंदे हिने तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळविले.ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या कु.श्वेताने राष्ट्रीय पातळीच्या स्पर्धेत यश प्राप्त करून आपल्या शाळेचे , गावाचे नाव राष्ट्रीय पातळीवर नेल्याबद्दल तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नियमितपणे प्राणायाम, योगसाधना म्हणजेच सर्व विकारांवर रामबाण उपाय : योग प्रशिक्षक विष्णुदास बियाणी

## सातत्यपूर्ण योगसाधनेतून मानवी आरोग्य अधिक बहरते - जिल्हा सहाय्यक शल्यचिकित्सक संतोष शहाणे

**बीड । प्रतिनिधी**

एकविसाव्या शतकात विज्ञान प्रगत होत असले तरीही मानवी विकार वाढत आहेत. कामाच्या ठिकाणी होणारा त्रास, चिडचिडपण कमालीची व्यवहारीक स्पर्धा. आहार आणी विहारातील बदल, एकलकोंडेपणा, मोबाईल इंटरनेटच्या अती वापरामुळे निद्रानाश यासह स्थुलपणा वाढत आहे. जे साधक नित्यनियमाने शास्त्रोक्त पद्धतीने योगाची साधना करतात ते निद्रानाश, चिडचिडेपणा, मधुमेह, दमा यासह विविध आजारावर योग्य नियंत्रण व आराम मिळवतात. शरीर स्वस्थ ठेवण्यासाठी प्राणायाम, योगसाधना, सुर्य नमस्कार, आसणे तसेच योग्य तो आहार व विहार तेवढाच महत्त्वाचा असून योगीक क्रीयेतून मधुमेह, दमा यासारख्या विविध जटील आजारासह नैराश्य, ताण- तणावमुक्तीसाठी नियमि



तपणे प्राणायाम, योगसाधना म्हणजेच सर्व विकारांवर रामबाण उपाय असल्याचे प्रतिपादन योग प्रशिक्षक तथा दिपमाळ योगा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष श्री विष्णुदास बियाणी यांनी केले.

जागतिक योगदिनानिमित्त शनिवार दि. २१ जुन २०२५ रोजी जिल्हा रुग्णालयाच्या व आयुष डिपार्टमेंट द्वारा धन्वंतरी सभागृह, बीड येथे योग प्रशिक्षक विष्णुदास बियाणी यांच्या मार्गदर्शनाने योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जिल्हा सहायक शल्यचिकित्सक डॉ.संतोष शहाणे, नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य बेद्रे मॅडम, आयुष विभागाचे डॉ. आनंद लिमकर, गिरी मॅडम, डॉ. पाखरे, डॉ. राऊत आदीसह विविध विभागाचे विभाग प्रमुख, जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर्स, सिस्टर्स, नर्सेस, ब्रदर्स, वार्ड बॉय, नर्सिंग महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला योग ऋषी, धन्वंतरीचे पूजन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

पुढे बोलताना योग प्रशिक्षक विष्णुदास बियाणी म्हणाले की, दरवर्षी २१ जून रोजी 'जागतिक योग दिन' साजरा केला जातो. मानवी जीवनात योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. योगाभ्यासामुळे मानवी जीवनात शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक पातळीवर अनेक सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होते. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा व्हावा असा प्रस्ताव संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत मांडला. योग ही भारताची प्राचीन परंपरा असून ज्ञान प्राप्त करण्यासाठी आणि शरीर व मन तंदुरुस्त राखण्यासाठी विशिष्ट योगसाधना केल्या जातात.

दैनिक मराठवाडा पत्र — दि. २७/०६/२०२५

**टी.सी. हरवला आहे.**

ओंकार मोहन चव्हाण या नावाचा बारावी पासचा टीसी हरवला आहे. कोणाला सापडल्यास पत्ता : शाहूनगर, बीड. मो. नंबर वर संपर्क साधावा.

**संपर्क- मो.न. ९६२३९८६९१९**

दैनिक मराठवाडा पत्र — दि. २७/०६/२०२५

**टी.सी. हरवला आहे.**

श्रद्धा अशोक पिसाळ या नावाचा बारावी पासचा टीसी बीड ते ढेकनमोहा प्रवासात हरवला आहे. कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.

**संपर्क- ९०२१९२०६५६**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. वसंत एस. यादव साहेब, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक : ९८२/२०२५**

**मेघराज व इतर -वि- निरंक**

ज्याअर्थी मयत नामे धर्मराज ज्ञानोबा माने रा. मानेवाडी ता.जि.बीड हे दि. ११/०७/२०२३ रोजी मौजे मानेवाडी ता. जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार- १) मेघराज पि. धर्मराज माने, वय ३८ धंदा शेती, रा. मानेवाडी ता. जि. बीड, २) मंगल भ्र. विभीषण आधारे, वय-५२ वर्ष, धंदा घरकाम व शेती, रा. मानेवाडी ता. जि. बीड, ३) सुरेखा भ्र. शहाजी पवार, वय ४९ वर्ष, धंदा घरकाम, रा. ब्राम्हण गल्ली, दत्त नगर याशी ता. वाशी जि. उस्मानाबाद, ४) सुरेखा भ्र. रमेश खंडागळे, वय ४७ वर्ष, धंदा घरकाम व शेती, रा. मात्रेवाडी पो. जांब ता. जि. उस्मानाबाद, ५) मनीषा भ्र. सुधीर भोगल वय ४५ वर्ष, धंदा घरकाम व शेती रा. अंतरवाली ता. भूम जि. उस्मानाबाद, ६) पश्चिम भ्र. समाधान सुरवसे, वय ४३ वर्ष, धंदा घरकाम व शेती, रा. घाट पिंपरी, ता. वाशी जि. उस्मानाबाद

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे धर्मराज ज्ञानोबा माने रा. मानेवाडी ता. जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज २७/०६/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : ०४/०८/२०२५

**(मार्फत अँड. वाय. एस. टेकाडे बीड)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**शिक्का**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती मनिषा एस. पठारे, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ९८६/२०२५**

**अर्जदार :-** १.रामदास शंकर टेकाडे, वय वय ७२ वर्षे धंदा शेती, रा. अंधापुरी ता.जि.बीड, २.बारीकराव शंकर टेकाडे, वय ६७ वर्षे धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३. रत्नमाला गणेश नेवडे वय ६१ वर्षे धंदा घरकाम व शेती, रा. कामखेडा, ता. जि. बीड. ४. सुभाष शंकर टेकाडे (मयत) ४-१. बसंताबाई सुभाष टेकाडे, वय ६५ वर्षे, रा.कामखेडा, ता. जि. बीड. ४-२. योगेश सुभाष टेकाडे, वय ३९ वर्षे धंदा वकीली. रा. वरीलप्रमाणे. ४-३. संतोष सुभाष टेकाडे, वय ३४ वर्षे धंदा इंजीनीयर, रा. वरीलप्रमाणे. ४-४. आशा सुभाष टेकाडे, वय ३४ वर्षे, शेती व घरकाम, रा. वरीलप्रमाणे, ४-५. छाया दत्तात्रय गोरे, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. समनापुर ता. जि. बीड. ४- ६. जयश्री दिपक रोहिटे, वय ४३ वर्षे, धंदा ३५, धंदा घरकाम, रा. बार्शी नाका बीड, ता.जि. बीड. घरकाम,

विरुध्द निरंक

**प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे शशिकला शंकर टेकाडे हे दि. १९/०२/२०२५ रोजी राहते घरी अंधापुरी, ता. जि.बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ व २ हे मयताचे मुले आहेत. तर अर्जदार क ३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. तसेच अर्जदार क ४ हा मयताचा मयत मुलगा आहे. अर्जदार क ४-१ ही मयताची सुन म्हणजेच मयताचा मयत मुलगा सुभाष ची पत्नी आहे. अर्जदार क ४-२ ते ४-६ हे मयताचे नातु म्हणजेच मयताचा मयत मुलगा सुभाष यांचे मुले व मुली आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- २५/०६/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीख:- ०४/०८/२०२५.

**(मार्फत विधिज्ञ: श्री वाय. एस. टेकाडे )**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**शिक्का**

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

शनिवार, दि.२८ जून २०२५ पान ४

## दहावी, बारावी परीक्षा केंद्र परिसरात मनाई आदेश

**बीड ।** प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जून-जुलै-२०२५ आयोजित केल्या आहेत. बारावीची १६ जुलैपर्यंत आणि दहावी ८ जुलैपर्यंत परीक्षा आहे. या परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात व परीक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी, अनाधिकृत कृत्य होऊ नये याकरीता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आल्याचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी निर्गमित केले आहेत. परीक्षेच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना आदेश लागू राहणार नाहीत. परीक्षा केंद्राबाहेर व परिसरात परीक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी व परीक्षार्थी यांना वगळून दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. परीक्षा केंद्राचे १०० मी परिसरातील सर्व झेरॉक्स केंद्र, फॅक्स केंद्र व ध्वनीक्षेपक इ. परीक्षा सुरु होण्याच्या एक तास अगोदरपासून ते परीक्षा पेपर ▶▶ उर्वरित पान २ वर

# अंबाजोगाईत अश्व रिंगण सोहळ्याला भाविकांची उसळलेली गर्दी; वारकऱ्यांच्या खेळांनी रसिक मंत्रमुग्ध

**अंबाजोगाई ।** प्रतिनिधी

अषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी सायंकाळी अंबाजोगाई शहरातील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या मैदानावर चार पालख्यांचा एकत्रित अश्व रिंगण सोहळा उत्साहात पार पडला. या भव्य सोहळ्याला शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाची रंगत वाढवली.





शहरात दाखल झालेल्या संत नामदेव महाराज (नरसी, हिंगोली), महसूल विभाग (अंबाजोगाई), संत मोहनानंद महाराज व चारोधाम हनुमान पायी पालखी यांचा एकत्रित रिंगण सोहळा मोठ्या थाटात पार पडला. बँड पथक, टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत पालख्या मैदानात दाखल होताच वातावरण भक्तिमय झाले. यावेळी आयोजक समितीतर्फे ध्वजारोहण, पालखी पूजन व अश्वपूजा करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. सजवलेल्या अश्वांमधून रिंगण करताना भगवी पताका हाती घेतलेले वारकरी लक्षवेधी ठरत होते. याच वेळी संत ज्ञानेश्वरांनी भिंत चालविलेल्या प्रसंगाचे देखावे विशेष आकर्षण ठरले. महिलांच्या पारंपरिक फुगड्या, वारकऱ्यांच्या कुस्त्या आणि विविध मैदानी खेळांनी उपस्थितांना आनंदित केले. बाल वारकऱ्यांची झालेली दिंडी स्पर्धा, वेशभूषा आणि संदेशमूल्य असलेल्या गीते प्रेक्षकांच्या मनात ठसा उमटवणारी ठरली. या वेळी स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, अक्षय मुंदडा, तहसीलदार विलास तरंगे, प्रकाश बोरगावकर, दिलीप सांगळे, बळीराम चोपणे, ॲड. संतोष लोमटे आदी मान्यवर उपस्थित होते. भाविकांसाठी पिण्याचे पाणी व फराळाची व्यवस्था करण्यात आली होती.

दिंड्यांचे एकत्रीकरण होणार?- विदर्भ व मराठवाड्यातून अंबाजोगाईमार्गे सुमारे २७४ दिंड्या पंढरपूरकडे प्रस्थान करत असतात. या दिंड्यांमध्ये समन्वय साधून त्यांना संत नामदेव महाराज व संत जनाबाई यांच्या दिंडीबरोबर एकत्र नेण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी दिली.

बाल वारकरी वेशभूषा स्पर्धा रंगली- रिंगण सोहळ्याच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# नराधम शिक्षकांना फासावर लटकवा : वर्षा जगदाळे यांची मागणी

**बीड ।** प्रतिनिधी



गुरु शिष्याच्या नात्याला काळीमा फासणाऱ्या उमा किरण येथील खाजगी क्लासेसचे शिक्षकांना तात्काळ अटक करत फासावर लटकवण्याची मागणी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी केली आहे. खाजगी क्लासेस मध्ये शिकवणी घेणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या प्राध्यापक विजय पवार व प्रशांत खटावकर हे दोन्ही आरोपी गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार झाले आहेत. पोलीस प्रशासनाने तात्काळ या दोघांना अटक करावी. बीड जिल्ह्यात मागील काही वर्षात महिला व मुलीवर अत्याचारात वाढ झाली आहे. शिक्षण क्षेत्रातील या घटनेमुळे बीड जिल्ह्याची मान शर्मानि पुन्हा खाली गेली आहे. विशेष म्हणजे यातील आरोपी हा सामाजिक ▶▶ उर्वरित पान २ वर

# राजर्षी शाहुजी महाराज हे उपेक्षित, वंचितांचे लोकनायक आहेत: डॉ.राजेश इंगोले

**शाहू महाराजांचे लोककल्याणकारी राज्य आजचे राज्यकर्ते का निर्माण करू शकत नाहीत - प्रा.गौतम गायकवाड**

**अंबाजोगाई ।** प्रतिनिधी





महात्मा फुले स्मारक समिती अंबाजोगाई तर्फे छत्रपती राजर्षी शाहूजी महाराज यांची १५१ वी जयंती मोठ्या उत्साहात स्मारक समिती नगरात साजरी करण्यात आली. यावेळी विचारमंचावर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. राजेश इंगोले हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तर कार्यक्रमाला प्रमुख व्याख्याता म्हणून खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य लेखक विचारवंत प्रा.गौतम गायकवाड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात छत्रपती शाहूजी महाराज, महात्मा ज्योतिराव ▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टीची पीएम श्री शाळेसाठी निवड

**गुणवत्तेचं खणखणीत नाणं, जिल्हा परिषद शाळा हेच अस्सल सोनं**




**आष्टी ।** प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातीलच नव्हे तर बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद बीड ची सर्वात जास्त मुलींची पटसंख्या असलेली व मुलींना स्वरक्षणाची हमी देणारी तसेच १०० % निकालाची उज्वल परंपरा असलेली जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी, ता. आष्टी, जि. बीड असून आजच्या धावपळीच्या युगात गुणवत्तेचं शिक्षण मिळणं म्हणजेच समाजाच्या भविष्याची ग्वाही, हेच वास्तव आष्टी येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेने आपल्या कार्यातून सिद्ध केलं आहे. आधुनिक शाळांच्या झगमगाटात ही शाळा गुणवत्तेचे ठिकाण आहे. शहर बदलतील, देश बदलेल हे स्वप्न साकार करण्याची खरी सुरुवात होते ती प्राथमिक शिक्षणातून आणि हेच स्वप्न साकार करण्याचे कार्य आष्टी येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला सातत्याने करत आहे. गुणवत्ता, उपक्रमशीलता, स्वच्छता, पर्यावरण सजगता आणि सर्वांगीण विकास यामुळे ही शाळा खऱ्याअर्थाने शिक्षण व्यवस्थेचा मानबिंदू ठरली आहे. सुसज्ज दोन मजली इमारत, २४ वर्गखोल्या, सी. सी. टिव्ही कॅमेरे, शिक्षकांसाठी डिजीटल उपस्थिती, शुद्ध पाणी पिण्याची खास व्यवस्था, स्वतंत्र बोरवेल, मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, स्वयंपाकासाठी अद्ययावत किचन शेड, बाग फुलवणारा हिरवागार परिसर हे शाळेचे जणू आकर्षण बनले आहे. परिसर अनेक प्रकारांच्या झाडांनी नटलेला असून, पर्यावरणस्नेही शाळा म्हणून तिची वेगळी ओळख आहे. शाळेत इ. १ ली ते इ. १० वी सर्व वर्ग सेमी इंग्रजीत असून प्रशिक्षित व पुरस्कारप्राप्त शिक्षक मार्गदर्शन करतात. स्पर्धा परीक्षा, सामान्यज्ञान, नवोदय, मंथन, ▶▶ उर्वरित पान २ वर



# अंबाजोगाई येथील सिरसाट कोचिंग क्लासेसचे अभूतपूर्व यश

**योगेश्वरी पॉलीटेक्निक कॉलेजच्या एकुण २० विद्यार्थ्यांनी घेतले गणित विषयात १०० पैकी १०० गुण**

**अंबाजोगाई ।** प्रतिनिधी

येथील नामांकित योगेश्वरी शिक्षण संस्थे अंतर्गत असणारे पॉलिटेक्निक कॉलेज यावर्षी गुणवत्तेत मराठवाड्यात सर्वप्रथम आले असून कॉलेजमधील प्रा.नारायण सिरसाट यांच्या गणित विषयात तब्बल वीस (२०) विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण घेतल्याने कॉलेजसह प्रा.सिरसाट यांच्या खाजगी सिरसाट कोचिंग क्लासेसचेही मोठे कौतुक होत आहे.

मराठवाड्याचे शैक्षणिक माहेरघर म्हणवणाऱ्या अंबाजोगाई येथील नामांकित अशा योगेश्वरी शिक्षण संस्थेने अलीकडच्या दशकात सुरू केलेल्या पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये दरवर्षी अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी उत्तीर्ण होतात. शिवाय कॉलेज कॅम्पसमध्येच शेवटच्या वर्षात पुणे-मुंबई-नाशिक येथील कंपन्या येऊन थेट मुलाखती घेऊन अनेक विद्यार्थ्यांना नौकरीची सुवर्णसंधी उपलब्ध करून हाताला कामही देतात. यामुळे या संस्थेत प्रवेश घेण्याकडे पालक व विद्यार्थ्यांचा चांगलाच कल वाढलेला आहे. अशा या नामांकित संस्थेच्या पॉलिटेक्निक कॉलेजनेही आता चांगलीच भरारी घेतल्याने मराठवाड्यामध्ये या कॉलेजची सुद्धा आता वेगळीच ओळख निर्माण झाली आहे. कॉलेजचे यशस्वी प्राचार्य प्रा. रमणजी देशपांडे यांच्या अगदी शिस्तबद्ध नियोजन व काटेकोरपणे असलेल्या लक्षाने आणि त्यांना प्रा.नारायण सिरसाट यांच्यासारख्या नामांकित गणित तज्ञाची खंबीर साथ व ईतरही ▶▶ उर्वरित पान २ वर

# लिंबागणेश येथील गतिरोधकाचा प्रश्न मार्गी लागणार

**अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, रस्ता सुरक्षा समितीचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग रवींद्र तोंडे, वाहतूक शाखा प्रमुख सुभाष सानप यांनी केली पाहणी**

**लिंबागणेश ।** प्रतिनिधी



बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मांजरसुंभा ते पाटोदा मार्गावरील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या अपघातप्रवण क्षेत्रात गतिरोधक बसवावेत या मागणीसाठी गेल्या ३-४ वर्षांपासून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी वारंवार पुकारलेल्या आंदोलनाची प्रशासनाकडून अखेर दखल घेण्यात आली असुन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्हा सुरक्षा रस्ता समितीत हा विषय घेतल्यामुळे त्यांच्या आदेशाने आज दि.२६ गुरुवार रोजी सकाळी अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, रस्ता सुरक्षा समितीचे सचिव तथा बांधकाम विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे आणि वाहतूक शाखेचे प्रमुख सुभाष सानप यांनी लिंबागणेश येथे पाहणी केली. यावेळी डॉ.गणेश ढवळे, हरिओम क्षीरसागर, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक हावळे व शिक्षकवृंद उपस्थित होते. अतिरिक्त पोलिस अधीक्षक सचिन पांडकर व बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे,वाहतुक शाखेचे प्रमुख सुभाष सानप यांनी प्रत्यक्ष ▶▶ उर्वरित पान २ वर

